महाराष्ट्र शासन
# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
Email Id: roaurangabad@dtemaharashtra.gov.in, website: www.dteau.org

जा.क्र: विकाऔ/शिक्षण/२०२१/ 2426 दिनांक :- 01 SEP 2021

**परिपत्रक/महत्वाचे** :-

प्रति,
प्राचार्य,
सर्व विना अनुदानित पदविका/पदवी/पदयुत्तर पदवी
व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,
(औरंगाबाद विभाग.)

विषय :- **महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन), अधिनियम,२०१५ च्या कलम २३ खाली तयार करण्यात आलेल्या नियमांचे पालन करण्याबाबत.**

संदर्भ :-
१. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र. ४२७/तांशि-४, दि.०३/०१/२०१९
२. मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्रमांक:२अ/एडीएम/ नियम/२०२१/३५४, दि.२७/०८/२०२१.
३. या कार्यालयाचे पत्र जा.क्र./विकाऔ/शिक्षण/२०१९/४६५, दि.०४/०२/२०१९.
४. या कार्यालयाचे पत्र जा.क्र./विकाऔ/शिक्षण/२०२१/२०३९, दि.२३/०७/२०२१.

उपरोक्त विषयी संदर्भ क्रं.१ व २ च्या अनुषंगाने या कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व विना अनुदानित पदविका/पदवी/पदयुत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन), अधिनियम, २०१५ च्या कलम २३ खाली तयार करण्यात आलेल्या नियमांबाबत संदर्भ क्रं.३ व ४ अन्वये कळविण्यात आलेले होते.

त्याअनुषंगाने पुनश्च संदर्भ क्रं.१ चे शासन परिपत्रक व संदर्भ क्रं.२ चे पत्र सोबत जोडले असून त्यातील अटींचे व सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे, जसे एखाद्या विद्यार्थ्याने त्याचा प्रवेश रद्द केल्यानंतर त्याची मुळ कागदपत्रे परत करणे, कट ऑफ डेट पुर्वी प्रवेश रद्द केला असेल तर नियमानुसार शुल्काचा परतावा करणे इ. या अटीचे उल्लंघन केल्यास परिपत्रकातील तरतुदीनुसार संस्था दंडास पात्र राहील, यांची नोंद घ्यावी.

सोबत :- वरीलप्रमाणे.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- १. मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

C:/EDUCATION-2020-21/CERCULAR-2021

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk2a@dtemaharashtra.gov.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in


महत्वाचे/तातडीचे

क्रमाक:२अ/एडीएम/नियम/२०२१/ ३५४

दिनांक : 27 AUG 2021

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती

विषय:-महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन, ) अधिनियम ,२००५ च्या कलम २३ खाली तयार करण्यात आलेल्या नियमांचे पालन करणेबाबत..

संदर्भ : महाराष्ट शासन , उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४२७/तांशि-४, दि. ३०जानेवारी ,२०१९

उपरोक्त संदर्भाधीन शासन परिपत्रका अन्वये महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन, ) अधिनियम ,२००५ च्या कलम २३ खाली तयार करण्यात आलेल्या नियमांचे पालन करणेबाबत शासनाने कळविले आहे.

त्यास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपल्या विभागा अंतर्गत येणा-या संस्थाना महाराष्ट्र शासनाच्या शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात यावे.

तसेच संबंधित शासन परिपत्रकानुसार आपल्या विभागातील संस्था कार्यवाही करतात किंवा नाही याबाबत आपण आवश्यक ती खबरदारी घेण्यात यावी. (सोबत माहितीसाठी संबंधित शासन परिपत्रक जोडले आहे.)

सहसंचालक, तंत्रशिक्षण,
वि.का औरंगाबाद
आवक क्र. ५३२८
दिनांक 27 AUG 2021

(प्रमोद नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन), अधिनियम, २०१५ च्या कलम २३ खाली तयार करण्यात आलेल्या नियमांचे पालन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४२७/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
दिनांक : ०३ जानेवारी, २०१९

वाचा :- १) शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : टीईएम-२०१६/ सीआर.४७३/(भाग-३)/टीई-४, दिनांक २४ एप्रिल,२०१७
२) शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : टीईएम-२०१६/ प्र.क्र.४७३/१६(भाग-४)/तांशि-४, दिनांक २४ एप्रिल,२०१७
३) शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : टीईएम-२०१८/ सी.आर.२८/टीई-४, दिनांक ५ जून,२०१८
४) शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : टीईएम-२०१८/ सी.आर.२६/टीई-४, दिनांक ५ जून,२०१८

परिपत्रक :

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन), अधिनियम, २०१५ च्या कलम २०(१) मधील तरतूद खालीलप्रमाणे आहे :-

(१) कोणत्याही व्यक्तीने, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केले आहे असे, जर नियामक प्राधिकरणाचे मत झाले असेल तर त्यास, अशा व्यक्तीला,--

(क) पहिल्या वेळेच्या उल्लंघनाबद्दल, एक लाख रुपयांहून कमी नसेल परंतु, पाच लाख रुपयांपर्यंत असू शकेल एवढी किंवा या अधिनियमान्वये निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक घेतलेल्या रकमेच्या दुप्पट रकमेएवढी, यापैकी जी अधिक असेल, एवढी शास्ती भरण्याचे;

(ख) दुसऱ्या किंवा नतंरच्या उल्लंघनाबद्दल, दोन लाख रुपयांहून कमी नसेल परंतु, दहा लाख रुपयांपर्यंत असू शकेल एवढी किंवा या अधिनियमान्वये निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक घेतलेल्या रकमेच्या दुप्पट रकमेएवढी, यापैकी जी अधिक असेल, एवढी शास्ती भरण्याचे; निदेश देता येतील.

२. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन), अधिनियम, २०१५ च्या कलम २३ व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन पूर्ण वेळ व्यावसायिक पदव्युत्तर पदवी तांत्रिक पाठ्यक्रम अभ्यासक्रमाचे प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान, व्यवस्थापनशास्त्र, संगणक उपयोजन (Computer Application) तसेच पूर्ण वेळ व्यावसायिक पदवीपूर्व तांत्रिक पाठ्यक्रमांचे प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान या अभ्यासक्रमामध्ये द्यावयाचे प्रवेश विनियमित करण्यासाठी दिनांक २४ एप्रिल,२०१७ रोजी दोन स्वतंत्र नियम अधिसूचित करण्यात आले आहेत. या दोन्ही नियमांना दिनांक ५ जून,२०१८ च्या दोन स्वतंत्र अधिसूचनेव्दारे सुधारणा करण्यात आलेली आहे. या दोन्ही नियमांच्या मुख्य नियमांमध्ये नियम १५ समाविष्ट करण्यात आलेला आहे. पदव्युत्तर पदवी व पदवीपूर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या या दोन्ही सुधारणा नियमातील नियम क्रमांक १५(ग) मधील तरतूद पुढीलप्रमाणे आहे :-

१५. प्रवेश रद्द करणे व शुल्काचा परतावा, संस्थेव्दारे कागदपत्र परत देणे, -
(ग) "कोणतीही संस्था, ज्यांच्याकडे उमेदवारांनी त्यांची प्रमाणपत्रे, ,पदविका/ पदवी, व इतर कागदपत्रे त्या संस्थेमध्ये प्रवेशासाठी जमा केलेली असतील, व जर उमेदवार अशा संस्थेमध्ये अभ्यासक्रम पुढे चालू ठेवण्यासाठी किंवा त्या संस्थेतील सुविधा घेण्यासाठी इच्छुक नसतील अशा प्रसंगी जमा करण्यात आलेली प्रमाणपत्रे, पदविका/पदवी, व इतर कागदपत्रे उमेदवारास परत करण्यास कोणत्याही प्रकारे विरोध करणार नाहीत किंवा त्यासाठी अशा अभ्यासक्रमाचे किंवा इतर कोणतेही शुल्क अदा करण्यासाठी त्याच्यावर दबाव टाकणार नाहीत."

३. वर नमूद केल्याप्रमाणे अधिनियमातील तरतूदी व त्या खाली तयार केलेल्या नियमातील तरतूदी पाहता कोणत्याही संस्थेस विद्यार्थ्याने त्यांच्याकडे जमा केलेली प्रमाणपत्रे, पदविका/पदवी व इतर कागदपत्रे कोणत्याही कारणास्तव स्वत:कडे ठेऊन घेता येणार नाहीत. कोणत्याही परिस्थितीत कागदपत्रांची विद्यार्थ्याने मागणी केल्यास संस्थेला ती विद्यार्थ्याला परत करावीच लागतील. नियमातील या तरतूदीचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना सर्व विभागीय तंत्रशिक्षण सहसंचालक यांनी तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांना द्याव्यात. त्याचप्रमाणे, विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे संस्था परत करीत नसल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास त्या विद्यार्थ्यास सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडे तक्रार दाखल करण्याचा सल्ला द्यावा. तसेच विभागीय तंत्र शिक्षण सहसंचालक यांनी वर नमूद अधिनियमातील व त्याखालील नियमातील तरतूदी संस्थेच्या

निदर्शनास आणून विद्यार्थ्यांचे मूळ कागदपत्रे ३ दिवसाच्या आत त्यास परत करण्याचे संस्थेस सूचित करावे. याउपरही, संस्थेने नियमातील तरतूदीचे पालन करीत नसल्याचे विभागीय तंत्र शिक्षण सहसंचालक यांच्या निदर्शनास आल्यास त्यांनी अशा संस्थांविरुध्द महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन ), अधिनियम, २०१५ मधील कलम २० नुसार शास्ती करण्याचा प्रस्ताव तंत्र शिक्षण संचालकांकडे पाठवावा. तंत्र शिक्षण संचालकांनी हा प्रस्ताव प्रवेश नियामक प्राधिकरणासमोर उचित अभिप्रायासह ठेवावा व तसे विद्यार्थ्यास सूचित करावे.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०१०३१२०१०५८००८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay A. Dharurkar

Digitally signed by Sanjay A. Dharurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee23011448b7fc64d138630b9c76ae7a2, cn=Sanjay A. Dharurkar
Date: 2019.01.03 15:03:04 +05'30'

**( संजय औ. धारुरकर )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये

**प्रत :**

१) आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२) सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
३) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
४) सर्व सहसचिव/उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
५) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी,
६) मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव,
७) निवड नस्ती (तांशि-४)

# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१९/ ४६५

दिनांक :- 4 FEB 2019

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय / अनुदानित / विना-अनुदानित पदविका /

पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,

**औरंगाबाद विभाग**

विषय : _ **महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ च्या कलम २३ खाली तयार करण्यात आलेल्या नियमांचे पालन करण्याबाबत...**

संदर्भ : १) शासन परिपत्रक उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१८/प्र.क्र.४२७/तांशि-४, दिनांक ०३/०१/२०१९

२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०१९/१०७ दि.३०/०१/२०१९

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, शासनाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियमन २०१५ मधील तरतूदी व त्यानूसार करावयाच्या कारवाईची माहिती देण्यात आली आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे.

तसेच दिनांक ५ जून २०१८ च्या दोन अधिसूचनांद्वारे पूर्ण वेळ व्यावसायिक पदवीपूर्व व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. या सुधारणा नियमांतील नियम क्रमांक १५(ग) मधील तरतूदीनुसार कोणत्याही संस्थेस विद्यार्थ्याने त्यांच्याकडे जमा केलेली प्रमाणपत्रे, पदविका/पदवी व इतर कागदपत्रे कोणत्याही कारणास्तव स्वत:कडे ठेवून घेता येणार नाहीत. कोणत्याही परिस्थितीत कागपत्रांची विद्यार्थ्याने मागणी केल्यास संस्थेला ती विद्यार्थ्याला परत करावीच लागतील. नियमातील या तरतूदीचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना देण्यात येत आहे.

पुढे असेही कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे संस्था परत करीत नसल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास त्या विद्यार्थ्यास सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडे तक्रार दाखल करण्याचा सल्ला देण्यात येईल. तसेच उपरोक्त नमूद अधिनियमातील तरतूदी या पत्रान्वये आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत असून विद्यार्थ्यांचे मूळ कागदपत्रे ३ दिवसांच्या आत त्यास परत करण्यात यावीत. त्याउपरही आपण उपरोक्त नियमातील तरतूदीचे पालन करीत नसल्याचे निदर्शनास आल्यास अधिनियमातील कलम २० नूसार शास्ती करण्याचा प्रस्ताव संचालनालयास पाठविण्यात येईल. याची या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.

(महेश शिवणकर)

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

सोबत : संदर्भिय शासन परिपत्रक

प्रत: १ मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई यांना माहितीस्तव सादर.

२ या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

C:\Users\admin\Desktop\Working RK\Institute Letter 2018-19.docx

महाराष्ट्र शासन
# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
Email Id: roaurangabad@dtemaharashtra.gov.in, website: www.dteau.org

जा.क्र: विकाऔ/शिक्षण/२०२१/ 2039 दिनांक : 23 JUL 2021

**परिपत्रक/महत्वाचे** :-

प्रति,
प्राचार्य,
सर्व विना अनुदानानित पदविका/
पदवी/पदयुत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,
(औरंगाबाद विभाग.)

**विषयः-** **महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन),अधिनियम,२०१५ च्या कलम २३ खाली तयार करण्यात आलेल्या नियमांचे पालन करण्याबाबत.**

**संदर्भ :-** **महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपक क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४२७/तांशि-४ मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०००३२ दि.०४ जानेवारी-२०१९**

उपरोक्त विषयी आपणांस सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन),अधिनियम,२०१५ च्या कलम २३ खाली तयार करण्यात आलेल्या नियमांबाबतचे शासन परीपत्रक सोबत जोडले असून त्यातील अटींचे व सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. या अटीचे उल्लंघन केल्यास परीपत्रकातील तरतुदीनुसार संस्था दंडास पात्र राहील यांची नोंद घ्यावी.

सोबत :- शासन निर्णयाची प्रत

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- १. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.